
Welcome

कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

शिरूर (कासार)



# Subject :- Economy (अर्थशास्त्र)

By
Dr. Pandit Mule
Dept. of Economy
Kalikadevi College, Shirur (ka.)Dist.Beed

## ४.४ गुंतवणूक गुणक - संकल्पना व मर्यादा

### Investment Multiplier - Concept and Limiations

अर्थशास्त्रीय विश्लेषणात गुणक या संकल्पनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. केन्सच्या रोजगार विषयक सिद्धतांत गुणक संकल्पनेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. गुणक संकल्पना मांडण्याचे श्रेय आर. एफ. कान्ह यांच्याकडे जाते. त्यांनी जून १९३१ च्या "Economic Journal" इकॉनॉमीक जनरल मध्ये लिहिलेल्या "The relation of home investment to unemployement" या लेखात गुणकाची कल्पना मांडली. परंतु आधुनिक अर्थशास्त्रीय विचारात गुणक संकल्पनेचे सविस्तर विवेचन लॉर्ड केन्स यांनी केले. या संकल्पने प्रमाणे प्रारंभी काही गुंतवणूक केली तर त्या गुंतवणुकीमुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होते.

**रोजगार गुणक** - (Employement Multiplier) आर. एफ. कान्ह यांनी गुणक संकल्पना 'रोजगार गुणक' म्हणून ओळखली जाते.

**कान्ह यांच्या मते** - "उद्योग व्यापारात गुंतवणूक केल्यामुळे प्रारंभी रोजगारात वाढ झाल्याने अंतिम रोजगार काही पटींनी वाढतो. ही वाढ दाखविणाऱ्या प्रमाणाला 'रोजागर गुणक' असे म्हणतात.

उदा. समजा, यंत्र उत्पादक करणाऱ्या व्यवसायातील गुंतवणूक वाढल्यामुळे सुरूवातीला १० लाख लोकांना रोजगार मिळाला. त्यामुळे या कामगारांना वेतनाच्या स्वरूपात उत्पन्न मिळेल. ते आवश्यक उपभोग्य वस्तुची मागणी करतील. सहाजिकच उपभोग्य वस्तुच्या निर्मितीला चालना मिळेल. त्यामुळे समजा, नवीन ४० लाख लोकांना रोजगार मिळाला तर एकूण रोजगार ५० लाख (१० + ४०) कामगारांना मिळाला आहे. मूळ गुंतवणूक वाढीने १०लाख लोकांना रोजगार मिळाला होता. अंतिम रोजगार ५० लाख आहे. त्यामुळे हे प्रमाण १ : ५ (५०/१०) असे होईल

म्हणजे रोजगार गुणक ५ येईल.

**व्याख्या - १) प्रा. केन्स** ''उत्पन्नात होणाऱ्या बदलाचे गुंतवणुकीत होणाऱ्या बदलाशी असलेले गुणोत्तर म्हणजे गुणक होय.''

**२) प्रा. गॉडवीन** - ''मूळ गुंतवणुकीत केलेली वाढ व त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात झालेली अंतिम वाढ व त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात झालेली वाढ या दोहोंचे संबंध स्पष्ट करणारी संकल्पना म्हणजे गुणक होय.''

थोडक्यात, गुंतवणुकीतील वाढ व उत्पन्नातील वाढ यांचे परस्परांशी असलेले प्रमाण म्हणजे गुणक होय उत्पन्नातील वाढ ही गुंतवणुकतीतील वाढीच्या अनेक पट असते. ज्या उद्योगाच्या गुंतवणुकीत वाढ होते. त्या उद्योगातील रोजगार वाढतो. मिळालेले लोक उपभोग्य वस्तुची निर्मिती करणाऱ्या इतर उद्योगातील उत्पन्न वाढते. राष्ट्रीय उत्पन्न पातळीतील अंतिम वाढ मूळ गुंतवणुकीतील वाढीच्या अनेक पट असते.

**गुणकाचे सूत्र व गुणक काढण्याच्या पद्धती**

(१) **पहिली पद्धत** - या पद्धतीत एकूण उत्पन्नातील वाढ किंवा बदल आणि एकूण गुंतवणुकीतील वाढ किंवा बदल विचारात घेतले जातात त्यासाठी पुढील सूत्राचा वापर केला जातो.

$$\text{गुणक} = \frac{\text{उत्पन्नातील बदल}}{\text{गुंतवणुकीतील बदल}}$$

$$k = \frac{\Delta Y}{\Delta Y}$$

$$k = \frac{200}{100}$$

समजा, उत्पन्नातील बदल २०० कोटी रुपये व गुतवणुकीतील बदल १०० कोटी रुपये असेल तर गुणकाचे मूल्य २ इतके येते.

$$k = \frac{\Delta Y}{\Delta Y}$$

$$k = \frac{200}{100}$$

समजा, उत्पन्नातील बदल २०० कोटी रुपये व गुतवणुकीतील बदल १०० कोटी रुपये असेल तर गुणकाचे मूल्य २ इतके येते.

$$k = \frac{\Delta Y}{\Delta Y}$$

$$k = \frac{200}{100}$$

२) **दुसरी पद्धती** - या पद्धतीत सीमान्त उपभोग प्रवृत्तीच्या आधारे गुणकाचे मूल्य काढले जाते. त्यासाठी पुढील सुत्राचा वापर केला जातो.

$$\text{गुणक} = \frac{१}{१ - \text{सीमान्त उपभोग प्रवृत्ती}}$$

## गुणकाची कार्यपद्धती किंवा उत्पन्न प्रसारणाची प्रक्रिया

## (Working of Multiplier of Income Progretion Process)

गुणकाची कार्यपद्धती वैशिष्टपूर्ण आहे. गुणाकामुळे राष्ट्रीय उत्पन्नात किती वाढ होईल ते समजते. उत्पन्न प्रसारणाची प्रक्रिया एकाच खर्च हे दुसऱ्याचे उत्पन्न असते. या तत्त्वावर आधारीत आहे. गुणकाचे मूल्य सीमान्त उपभोग प्रवृत्तीवर अवलंबून असते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत मुळच्या गुंतवणुकीत वाढ केल्यास या


Thank you!